M-99 कुलसचिव कार्यालय प्रत

161

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
# आणि
# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
# यांच्यात ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करावयाचा करार

विषय - शिक्षणशास्त्र


करार करून देणार -
कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक - ४२२२२२.
फोन नं. ०२५३ - २२३०४७०
ई-मेल - registrar@ycmou.digitaluniversity.ac

करार करून घेणार -
सचिव,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,
रविंद्र नाट्यमंदिर इमारत, २ रा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.
दूरध्वनी//फॅक्स क्र. ०२२-२४२२९०२०, ०२२-२४२२९०२७.
ई-मेल - sec.ms.mvkosh@gmail.com

## प्रकल्पाचे नाव - मराठी विश्वकोश अद्ययावतीकरण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना दि. १९ नोव्हेंबर १९६० रोजी झाली. त्यानंतर मंडळाचे विभाजन होऊन स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ' हे महाराष्ट्र शासनाने दि. १ डिसेंबर १९८० रोजी स्थापन केलेले मंडळ असून विश्वकोशाच्या द्वारा जगातील विविध विषयातील ज्ञान मराठीत आणण्यासाठी या मंडळाची स्थापना झाली. आपला उद्देश अधिक परिणामकारकरीत्या साध्य करण्यासाठी विविध विद्यापीठांना ज्ञानमंडळाच्याद्वारे सहभागी करून घेण्याकरिता विविध विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेतला आहे.

विश्वकोश मंडळाने आपल्या कार्यासाठी विविध विद्यापीठांचे सहकार्य घ्यावे असे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७ जून १९६४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे.

त्याचबरोबर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कायदा क्र. २० १९८९ मध्ये विद्यापीठांच्या दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त पुढील उद्देश देखील नमूद केलेले आहेत.

c) To promote acquisition of knowledge in a rapidly developing and changing society and to continually offer opportunities of upgrading knowledge, training and skill in the context of innovation, research and discovery in all fields of human endeavour by developing educational network with the use of modern communication media and technologies appropriate for a learning society:

g) To provide through incidental and non-formal means, for continuing and extension of education in various cultural forms, arts, crafts and skills of the country, raising their quality and improving their availability to the people;

k) To promote national integration, integrated development of the human personality and advance the culture of the people of Maharashtra in particular, and India in general, using rich cultural heritage and traditions of social reform of the people of Maharashtra.

तसेच, मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी ज्ञानमंडळे स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. विकोश २०१५/ प्र.क्र. १७१ / भाषा-२, दि. २३ फेब्रुवारी २०१६ नुसार व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या मान्यतेने सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ आणि कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यात सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश -** मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाच्या २० खंडांची निर्मिती केली असून या २० खंडांच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करणे, विविध विषयावरील नव्या माहितीची सातत्याने भर टाकणे यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना परिशिष्ट -१ नुसार करणे. प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करून ही सर्व ज्ञानमंडळे एकमेकांशी जोडणे व त्या आधारावर विश्वकोशाची पुढील रचना करणे हा उद्देश आहे.

**योजनेचे स्वरूप -**

१) मराठी विश्वकोश खंड १ ते २० मधील नोदींच्या अद्ययावतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कालबाह्य झालेल्या नोंदी निश्चित करणे, विद्यमान नोदींचे पुनर्लेखन करणे, नव्या नोदीं लिहून घेणे आदि विविध विषयांचा समावेश असेल. हे प्राथमिक काम झाल्यानंतर जगामध्ये प्रकाशित होणाऱ्या माहितीच्या साहाय्याने नोंदी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवणे याही कामाचा अंतर्भाव असेल. यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना करण्यात येत आहे. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ असेल आणि ही सर्व ज्ञानमंडळे विश्वकोशाशी जोडली जातील.

२) या योजनेच्या अंतर्गत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाने शिक्षणशास्त्र या विषयाची पालकसंस्था म्हणून ज्ञानमंडळाची जबाबदारी घेण्यासाठी हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

ज्ञानमंडळाची कार्यपध्दती, कामकाज पार पाडण्यासंबंधी अटी व शर्ती -

१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 'शिक्षणशास्त्र' या विषयाच्या ज्ञानमंडळाची जबाबदारी स्वीकारत आहे.

२) या ज्ञानमंडळात एक समन्वयक आणि पाच तज्ज्ञांचे सल्लागार मंडळ असेल. पाच तज्ज्ञांच्या सल्लागार मंडळातील दोन तज्ज्ञ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संबंधित असतील. उर्वरित तज्ज्ञांची निवड शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि ज्ञानमंडळामार्फत करावयाच्या कार्याला वेळ देऊ शकतील अशा तज्ज्ञांची निवड करण्यात येईल. ही निवड मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष, विषयपालक आणि संस्था प्रतिनिधी यांच्या परस्पर विचार विनिमयाने करण्यात येईल. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातील विषय पालक हे ज्ञानमंडळाचे पदसिध्द सदस्य असतील.

३) संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक व संशोधन संस्थेतील मराठीतून संशोधनात्मक लेखन करण्याचा अनुभव असलेले विषयतज्ज्ञ / सेवानिवृत्त तज्ज्ञ / संशोधक विद्यार्थी (M.Phil / Ph.D. / Other) यामधून समन्वयक नेमण्यात येईल. समन्वयक परिशिष्ट १ मध्ये 'समन्वयक' या शीर्षाखाली नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पार पाडतील.

४) ज्ञानमंडळाला आवश्यक कार्यालयीन सुविधा उदा. कार्यालय, इंटरनेट सुविधेसह संगणक, प्रिंटर इत्यादि व सल्लागार मंडळाच्या बैठकीसाठी आवश्यक सुविधा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक उपलब्ध करुन देईल.

५) शिक्षणशास्त्र या विषयातील लेखकांची कार्यशाळा / प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी तसेच ज्ञानमंडळाचे काम परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे चालविण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आवश्यक ती सर्व मदत करेल. ज्ञानमंडळाच्या माध्यमातून ज्या नोंदी तयार होतील त्यावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचा स्वामित्त्व हक्क राहील व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या सहकार्याची योग्य ती नोंद घेण्यात येईल.

६) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे स्थापन करण्यात आलेल्या ज्ञानमंडळाची कालमर्यादा कमाल तीन वर्षांची असेल, कामाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार हा कालावधी कमी अधिक करता येईल.

७) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे स्थापन करण्यात आलेल्या ज्ञानमंडळाच्या कामकाजासाठी खालील बाबींवर होणाऱ्या संभाव्य वार्षिक खर्चाची रक्कम महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत देण्यात येईल.

(१) समन्वयक मानधन रु. १५,००० X १२ = रु. १,८०,०००/-
(दरमहा समन्वयांकडून कामाचा अहवाल प्राप्त झाल्यावर मानधन अदा करण्यात यावे.)

(२) ज्ञानमंडळ तज्ज्ञांचा बैठक खर्च, स्टेशनरी व इतर खर्च - रु. २५,०००/-

(३) प्रशिक्षण / कार्यशाळेचा खर्च - रु. ३५,०००/-
( तज्ज्ञांचे मानधन प्रति तास रु. ७५० व प्रवास खर्च - वित्त विभाग, शा. नि. क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/ सेवा-५, दि. ३ मार्च २०१० नुसार
प्रशिक्षणार्थींचा व तज्ज्ञांचा अल्पोपहार खर्च - प्रति व्यक्ती, प्रति दिन रु. २५०/-, स्टेशनरी, इतर खर्च.)

* प्रशिक्षणार्थींचा प्रवास खर्च - प्रवास खर्च वित्त विभाग, शा. नि. क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ३ मार्च २०१० प्रमाणे मराठी भाषा विभाग शा. नि. क्र. विकोश-२०१५/प्र.क्र.१७१/भाषा-२, दि. २३.०२.२०१६ सेवासुविधा अ.क्र. ३ व ४ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित विद्यापीठ किंवा संस्था महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडून अदा करण्यात येईल.

८) ज्ञानमंडळाच्या संभाव्य वार्षिक खर्चासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठास दिलेल्या रकमेच्या खर्चाचे तपशिल व पावत्या दरमहा, तसेच वार्षिक खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विद्यापीठाकडून मराठी विश्वकोश निर्मिती मंडळास पाठविण्यात येईल. विद्यापीठाने एका जबाबदार कर्मचाऱ्याकडे याची जबाबदारी सोपवावी.

९) नोदींचे लेखन, समीक्षण-संपादन, भाषांतर करणाऱ्या तज्ज्ञांना मराठी भाषा विभाग, शासन निर्णय, क्र. मविवन-२०१३/प्र.क्र.७०/भाषा-२, दि. १० फेब्रुवारी २०१५ व शासन निर्णय क्र. मविवन-२०१३/प्र.क्र.७०/ भाषा-२, दि. १० मार्च २०१५ नुसार मानधन / मोबदला महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत देण्यात येईल.

१०) नोदींशी संबंधित चित्रे, रेखाटने, नकाशे, चलचित्रे, ध्वनिचित्रफित (Audio Visual) याबाबतचे मानधन / मोबदला महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत नियमानुसार देण्यात येईल.

११) या ज्ञानमंडळामार्फत प्रतिवर्षी किमान २५० ते ३०० नोदींचे लेखन, समीक्षण-संपादन कार्य पूर्ण करण्यात येईल.

१२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे स्थापन करण्यात आलेल्या ज्ञानमंडळाचा उद्देश संबंधित विषयातील अद्ययावत व परिपूर्ण माहिती मराठी भाषेतून अभ्यासकांना, जिज्ञासूंना मिळावी असा असल्याने हे काम अधिक चांगल्या रीतीने करण्याकरिता आगामी काळात ज्ञानमंडळाच्या कार्यपध्दतीत जे बदल करावे लागतील ते परस्परांच्या विचार विनिमयातून करण्यात येतील.

१३) 'शिक्षणशास्त्र' या विषयाशी संबंधित लोकांच्या मनात जागृती निर्माण व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने परस्पर विचार विनिमयातून उपक्रम राबविण्यात येतील.

१४) ज्ञानमंडळाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या नोदींचा उपयोग त्या त्या विषयातील विद्यापीठ / संस्था स्तरावरील अभ्यासक्रमासाठी व पूरक संदर्भ म्हणून विद्यार्थी, अभ्यासक व जिज्ञासूंना होईल. यासाठी संयुक्तपणे उपक्रमही राबविण्यात येतील.

स्थळ - मुंबई

दिनांक - १८ मे, २०१५

| करार करून देणार | करार करून घेणार |
| --- | --- |
| (डॉ. प्रकाश आतकरे) | (सु. ग. पवार) |
| कुलसचिव | सचिव |
| यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई. |

साक्षीदार - १) डॉ. संजीवनी महाले

२) सुवर्णा चव्हाण

## परिशिष्ट - १

**ज्ञानमंडळाची संकल्पना -**

मराठी विश्वकोशाचे १ ते २० खंडाच्या प्रकाशनाचे कार्य पूर्ण झाले आहे. विश्वकोशाचा पहिला खंड १९७६ साली प्रकाशित झाला असून २० वा खंड २०१५ साली प्रकाशित झाला आहे. विश्वकोशाच्या संहिता खंडाच्या पहिल्या आवृत्तीचे काम अ ते ज्ञ पर्यंत वर्णानुक्रमाने पूर्ण झाले आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानात नवनवीन संशोधनामुळे मोठया प्रमाणात भर पडलेली आहे. तसेच नवनवीन विद्याशाखा निर्माण होत आहेत. मानव्यशाखांमध्ये नव्या संकल्पना, विचारप्रवाह निर्माण होत असून हया सर्व बदलांची नोंद घेणे आवश्यक आहे.

विश्वकोश अद्ययावत करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व संशोधन संस्थांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. हे सहकार्य संस्थात्मक पातळीवर सोयी सुविधा, मनुष्यबळ, आर्थिक स्वरुपात आवश्यक आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. व्हीकेयू २०६४-बीएलसी, दिनांक १७ जून, १९६४ मध्ये विश्वकोशातील नोंदींचे/ लेखांचे लेखन, समीक्षण, संपादन इ. करण्यासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञता व विश्वकोशातील संबंधित विषयातील नोंदी लिहिण्याची क्षमता असलेले विद्यापीठातील प्राध्यापक (Teachers), संशोधक, तज्ज्ञ व्यावसायिक, विशेषज्ञ यांचे सहाय्य, मदत व प्रत्यक्ष सहभागी होण्याच्या आवश्यकतेचा उल्लेख केलेला आहे. विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी विद्यापीठांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

विश्वकोश सर्व विद्यापीठांच्या सहकार्याने विषयनिहाय ज्ञानमंडळाची स्थापना करुन अद्ययावतीकरणाची योजना कार्यान्वित करणार आहे. यासाठी विषयांचे १० विभागात वर्गीकरण करण्यात आले आहे. ते पुढील प्रमाणे. १) तत्वज्ञान, २) धर्म, ३) सामाजिकशास्त्रे, ४) भाषा, ५) विज्ञान, ६) तंत्रज्ञान, ७) कला, ८) साहित्य, ९) इतिहास व भूगोल, १०) इतर विषय.

या वर्गीकरणांतर्गत साधारणपणे ६० ते ७० विषय / उपविषय असतील व प्रत्येकी एक ज्ञानमंडळ स्थापन करण्यात येईल.

**१) ज्ञानमंडळाची आवश्यकता व उद्देश :-**

विश्वकोशाच्या नोंदींचे अद्ययावतीकरण ही निरंतर चालणारी ज्ञान प्रक्रिया आहे. त्यासाठी आजवरच्या कामाचे परिक्षण करुन काळानुसार नोंदींचे पुनर्लेखन करण्याची आवश्यकता आणि नव्या नोंदी लिहिण्याची गरज या सर्व गोष्टींची पूर्तता जलद गतीने पूर्ण करण्याकरिता प्रत्येक प्रमुख विषय-गटातील, उप-विषयातील तज्ज्ञ लोकांचे स्वतंत्र ज्ञानमंडळ असण्याची आवश्यकता आहे.

नोंदींचे विषय ठरविणे, विषयानुसार विश्वकोशाने निश्चित केलेल्या पध्दतीप्रमाणे नोंद लेखन करुन घेणे, तिचे संपादन आणि समीक्षण करणे व प्रकाशित करण्यासाठी विश्वकोश संपादकीय मंडळाकडे पाठविणे ही कामे ज्ञानमंडळाच्या माध्यमातून पूर्ण करणे हे ज्ञानमंडळाचे उद्दिष्ट आहे.

**२) ज्ञान मंडळाचे स्वरुप, रचना व कार्यपध्दती :-**

१) ज्ञानमंडळ विषयाच्या व्याप्तीनुसार विषयनिहाय / उपविषयनिहाय स्थापन करण्यात येतील.

२) एका ज्ञानमंडळामध्ये विषयाशी संबंधित ३ ते ५ तज्ञ व १ समन्वयक यांचा समावेश राहील.

३) ज्ञानमंडळे विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्थामध्ये कार्यरत असतील.

**ज्ञानमंडळामार्फत दोन ते तीन वर्षात विश्वकोशातील नोदींचे / माहितीचे संपूर्ण अद्ययावतीकरण करणे अपेक्षित आहे. याच माध्यमातून भविष्यात सातत्यपूर्ण अद्ययावतीकरणाची प्रक्रिया सुरु ठेवण्यात येईल.**

**कार्यपध्दती :-**

१) प्रत्येक ज्ञानमंडळ सोपविण्यात आलेल्या विषयाची व्याप्ती व मर्यादा ठरवून त्यानुसार नव्याने नोंदयादी तयार करेल.

२) नव्याने तयार केलेल्या नोंद यादीची जुन्या नोंद यादीशी पडताळणी करुन नव्याने समाविष्ट करावयाच्या नोंदी, कालबाहय नोंदी व अद्ययावत करावयाच्या नोंदी यांचा अहवाल तयार करेल व त्यानुसार नोंदनिहाय व्याप्ती, मर्यादा, शब्दसंख्या निश्चित करुन अंतिम नोंद यादी तयार करेल.

३) ज्ञानमंडळातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शन व सहाय्याने नोदींचे लेखन, समीक्षण-संपादन, भाषांतर केले जाईल. त्यासाठी ज्ञानमंडळ त्या त्या विषयांतील तज्ञ, लेखक-समीक्षक यांची नावे निश्चित करेल.

४) विश्वकोशातील नोंद लेखकांना लेखन कसे करावे यासाठी ज्ञानमंडळाच्या माध्यमातून कार्यशाळा आयोजित केल्या जातील.

५) ज्ञानमंडळ नोंद लेखन, समीक्षण-संपादन, भाषांतर यासाठी कालमर्यादा निश्चित करेल.

६) नोंदींचे लेखन करणाऱ्या तज्ञांनी दिलेले नोंदींचे संदर्भ, त्यासंबंधीची चित्रे, रेखाचित्रे, नकाशे, आराखडे, Audio Visual याची पडताळणी व संपादन ज्ञानमंडळामार्फत करण्यात येईल.

७) नोंदींशी संबंधित चित्रे, रेखाचित्रे, नकाशे, आराखडे, Audio Visual व टंकलेखन यासाठी आवश्यकता असल्यास स्वतंत्र तज्ज्ञांमार्फत काम करण्यात येईल.

८) लेखक लेखासोबत दिलेली चित्रे, रेखाटने, छायाचित्रे, दृकश्राव्य चलचित्र त्याबाबतच्या स्वामित्व हक्क धारकाच्या परवानगीसह नोंद पाठवतील.

९) ज्ञानमंडळाच्या आवश्यकतेनुसार बैठका घेण्यात येतील.

१०) नोंद संकेतस्थळावर टाकण्याच्या दृष्टीने अंतिम संपादनाचे काम ज्ञानमंडळ करेल व विभाग संपादकाकडे सोपवेल.

११) ज्ञानमंडळाचे कामकाज संगणक व आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून चालेल. उदा. नोंदी सोपविणे,नोंदींची देवाणघेवाण, परस्पर संपर्क इ.

१२) सर्व ज्ञानमंडळे प्रमुख संपादक तथा अध्यक्ष यांचा सल्ला व मार्गदर्शनुसार काम करतील.
१३) ज्ञानमंडळाच्या कामाचे व्यवस्थापन वाई व मुंबई येथील विभाग संपादकाव्दारे करण्यात येईल. विभाग संपादक हे प्रमुख संपादक तथा अध्यक्ष व सचिव यांनी ठरवून दिल्यानुसार काम करतील.
१४) विभाग संपादक हे ज्ञानमंडळ समन्वयकांच्या आवश्यकतेनुसार बैटका घेतील व समन्वयक आपल्या कामाचा अहवाल वेळोवेळी विभाग संपादकांकडे सादर करतील.
१५) प्रमुख संपादकांच्या मान्यतेने विभाग संपादकांकडून नोंदी संकेतस्थळावर टाकण्यात येतील.

**विषय पालक -**

विश्वकोश मंडळातील सदस्यांवर पालक या नात्याने काही विशिष्ट विषयांचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी असेल. ज्या पालकांवर विशिष्ट विषयांची जबाबदारी आहे त्यांनी त्या विषयगटाच्या अंतर्गत ज्ञानमंडळाकरीता उपविषय निश्चित करणे, ज्ञान मंडळासाठी पालक संस्था शोधणे, विविध ज्ञानमंडळासाठी समन्वयकांची व तज्ज्ञांची निवड करणे, विविध विषय गटांनुसार तुलनात्मकरीत्या / महत्त्वानुसार नोदींची संख्या निश्चित करणे, ज्ञानमंडळातील विषय तज्ज्ञांच्या आवश्यकतेनुसार बैठका घेणे, ज्ञानमंडळाचे कार्य प्रभाविपणे पार पाडण्याची जबाबदारी घेणे अपेक्षित आहे.

**पालक संस्था -**

विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी महाराष्ट्रातील विद्यापीठे, त्यांच्या अंतर्गत असलेली महाविद्यालये, विविध शैक्षणिक संस्था व संशोधन संस्था यांच्या सहकार्याने संबंधित संस्थेत विषयनिहाय ६० किंवा अधिक ज्ञानमंडळे स्थापन करण्यात येतील. ज्या विद्यापीठांनी किंवा संस्थांनी ज्या विषयातील ज्ञानमंडळाच्या पालकत्वाची जबाबदारी घेतली आहे त्या संस्था त्या ज्ञानमंडळाच्या पालक संस्था असतील. ज्ञान मंडळाकडे सोपवलेल्या विषयांशी संबंधित लेखन, समीक्षण-संपादन, एकत्रीकरण व अंतिम तपासणी हे काम त्या त्या संस्थेत करण्यात येईल. त्यासाठी विषयनिहाय समन्वयक त्या त्या संबंधित संस्थेत कार्यरत असतील. ज्या पालक संस्था ज्ञानमंडळाची जबाबदारी घेतील त्यांनी ज्ञानमंडळास आवश्यक त्या कार्यालयीन सेवा-सुविधा उपलब्ध करुन देतील. यामध्ये जागेची व्यवस्था, निवास व्यवस्था व अन्य सेवासुविधांसाठी होणारा खर्च त्या त्या संस्था करतील. ज्ञानमंडळाचे काम सुरळित चालावे यासाठी बैठका, प्रशिक्षण, कार्यशाळा इत्यादी उपक्रम पालक संस्थांमार्फत हाती घेण्यात येतील.

**महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी व शैक्षणिक संशोधन संस्थानी ज्ञानमंडळाची पालक संस्था म्हणून सहकार्य करावे असे अपेक्षित आहे. प्रत्येक विद्यापीठांकडे काही ज्ञानमंडळाची जबाबदारी सोपविण्यात येईल. यासाठी संबंधित विद्यापीठ व संस्थांशी सामंजस्य करार करण्यात येतील.**

**समन्वयक -**

संबंधित विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था येथील मराठीतून संशोधनात्मक लेखन करण्याचा अनुभव असलेले विषय तज्ञ / सेवानिवृत्त विषयतज्ज्ञ /संशोधक विद्यार्थी (M.Phil/PH.D/Other) यांना समन्वयक म्हणून नेमण्यात येईल.

संबंधित विद्यापीठ, विश्वकोशाचे प्रतिनिधी व विषय पालक समन्वयकांची निवड करतील. विषय पालक व संबंधित विषयाच्या ज्ञानमंडळातील तज्ज्ञ यांच्या सहभागाने व मार्गदर्शनाने समन्वयक खालील जबाबदाऱ्या पार पाडतील.
१) संबंधित विषयाची व्याप्ती व मर्यादा ठरविणे, नोंद यादी तयार करणे.
२) नव्याने तयार केलेल्या नोंद यादीची जुन्या नोंद यादीशी पडताळणी करुन नव्याने समाविष्ट करावयाच्या नोंदी, कालबाहय नोंदी व अद्ययावत करावयाच्या नोंदी यांचा अहवाल तयार करणे व त्यानुसार नोंदनिहाय व्याप्ती व मर्यादांसह शब्दसंख्या निश्चित करुन अंतिम नोंद यादी तयार करणे.
३) विषयाशी संबंधित लेखक, समीक्षक-संपादक, भाषांतरकार यांची यादी तयार करणे.
४) लेखकांसाठी कार्यशाळा आयोजित करणे.
५) तज्ञांकडे नोंद लिहिण्यासाठी सोपविणे, समीक्षण-संपादन, भाषांतरासाठी सोपविणे व विहित वेळेत प्राप्त करुन घेणे.
६) नोंदीशी संबंधित संदर्भ, चित्र, रेखाटने, नकाशे, आराखडे, चलचित्रे, ध्वनिचित्रफित (Audio Visual) इत्यादीसह नोंद परिपूर्ण असल्याची खात्री करुन घेणे, नसल्यास संबंधितांकडून / आवश्यकतेनुसार अन्य तज्ञांकडून पूर्तता करुन घेणे.
७) लेखक लेखासोबत दिलेली चित्रे, रेखाटने, छायाचित्रे, दृकश्राव्य चलचित्र त्याबाबतच्या स्वामित्व हक्क धारकाच्या परवानगीसह नोंद पाठवतील. नकाशे मान्यतेची कार्यवाही विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत करण्यात येईल, त्याबाबतची शिफारस विभाग संपादक यांच्याकडे पाठविणे.
८) ज्ञानमंडळामार्फत अंतिम करण्यात आलेली नोंद संकेतस्थळावर टाकण्यासाठी विभाग संपादकांकडे पाठविणे.
९) विषय पालकांच्या सल्ल्याने ज्ञान मंडळाची बैठक आयोजित करणे .
१०) नोंदींची देवाणघेवाण, परस्पर संपर्क, इ. ज्ञानमंडळाशी संबंधित कामांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.
११) मा. अध्यक्षांना दरमहा कामकाजाचा अहवाल पाठवणे.
१२) समन्वयकांच्या बैठकीसाठी उपस्थित राहणे.

**मराठी विश्वकोशाच्या या उपक्रमाव्दारे महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि विविध संस्था यांच्या माध्यमातून विविध महत्त्वाच्या विषयांव्दारे मराठीमध्ये ज्ञानाची व माहितीची सातत्याने निर्मिती व्हावी व ही प्रक्रिया निरंतरपणे चालावी अशी कल्पना आहे. सर्व ज्ञानमंडळे संकेतस्थळाव्दारे एकमेकांशी जोडली जातील आणि त्याचा उपयोग महाराष्ट्रातील विविध समाजघटकांना होईल अशी अपेक्षा आहे.**